# विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सिक्युरिटीचे धडे

## क्विक हिल फाऊंडेशनच्या सहकार्याने अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात उपक्रम

**सोलापूर : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाने पुण्याच्या क्विक हिल फाऊंडेशनच्या सहकार्याने शहर व जिल्ह्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीचे धडे दिले. मोबाईलच्या माध्यमातून इंटरनेट वापरताना कोणकोणत्या बाबींची काळजी घ्यावी, कशाप्रकारे इंटरनेटचा वापर करावा, याविषयी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तब्बल ३० हजार ३२४ शालेय मुलांना प्रशिक्षण दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि पुण्याच्या क्विक हिल या सॉफ्टवेअर निर्मिती कंपनीत सामंजस्य करार झाला असून या माध्यमातून दरवर्षी सामाजिक बांधिलकी म्हणून संयुक्तपणे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.



**सोलापूर : सायबर सिक्युरिटीच्या प्रशिक्षणानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करताना कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस, अजय शिर्के, कुलसचिव डॉ. विकास घुटे आणि डॉ. आर. एस. मेंते.**

त्याचाच भाग म्हणून संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शहर व जिल्ह्यातील ७८ शाळांमध्ये जाऊन १६१ सेमिनार घेऊन तब्बल ३० हजार ३२४ विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीचे धडे दिले आहेत.

यामध्ये शालेय मुला-मुलींना इंटरनेटच्या माध्यमातून मोबाईलवर विविध ॲप्स डाऊनलोड करताना तसेच ऑनलाईन गेम खेळताना कशी आपली व्यक्तिगत माहिती संबंधित ॲप्सकडून घेतली जाते व ती घेऊ नये, यासाठी काय खबरदारी घ्यावी, याबाबतचे धडे देण्यात आले.

यानिमित्त विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने विद्यावेतन देण्यात आले. २२ विद्यार्थ्यांना तब्बल १ लाख ८१ हजार ३०० रुपये विद्यावेतन देण्यात आले. कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस आणि २२ विद्यार्थ्यांना फाऊंडेशनचे प्रमुख अजय शिर्के यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच विद्यावेतन रकमेचे वाटप करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विकास घुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आर.एस. मेंते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले.

यावेळी कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी अशा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते आणि सायबर सिक्युरिटी प्रशिक्षणाची खरी गरज आहे, असे सांगितले. शिर्के यांनी अलीकडच्या काळात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे सांगून त्या घटना रोखण्यासाठीच विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शालेय मुलांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले. यावेळी प्रशिक्षण घेण्यात आलेल्या शाळांमधील समन्वयकांनाही प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुंधती माळगे व ऐश्वर्या केत यांनी केले. आभार प्रा. ए. आर. शिंदे यांनी मानले.

# जनजागृती करा, मतदानाची टक्केवारी

